द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता :- ८१९-अ,भवानी पेठ,पुणे:-४११ ०४२.
नोंदणी क्र.:-बी-३०५६,दिनांक:-१४-११-१९६०.

दिनांक:-१३/०९/२०२२

पुनर्विकसन व्यवस्थापक समिती सभेचा वृत्तांत

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्थेची पुनर्विकसन व्यवस्थापक समितीची सभा मंगळवार दिनांक १६/०९/२०२३ रोजी संध्याकाळी ०६.३० वाजता वायएमसीए हॉल पहिला मजला आयोजित करण्यात आली होती. सदर सभेसाठी संस्थेचे पुनर्विकसन प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि संस्थेचे सन्माननीय सभासद उपस्थित होते. सभेमध्ये खालीलप्रमाणे विषयवार चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले त्याचा सविस्तर वृत्तांत विषय व ठराव यास्वरूपात खालीलप्रमाणे ठरविण्यात आला.

सभेपुढील विषय

**विषय क्र.:-१.** पुनर्विकसन निविदा ओपन करून निर्णय घेणे.

संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री.विजय ओसवाल यांनी मागील सभेपासुन आजपर्यंत झालेल्या कामाचा सविस्तर वृत्तांत सभेसमोर मांडला तो खालीलप्रमाणे.

पुनर्विकसन समिती सभेमध्ये चर्चा होवुन निविदा/टेंडर नमुना मंजुर करण्यात आला. संस्थेने दि.०१ ऑगस्ट २०२३ ते दि.१० ऑगस्ट २०२३ पर्यंत निविदा मागवाव्या आणि दि.२२ ऑगस्ट २०२३ पर्यंत विकसकांनी निविदा भरून संस्थेकडे जमा कराव्या असे आवाहन करण्यात आले. हया संबंधात १२ विकसकांनी निविदा अर्ज नेले, आणि ११ विकसकांनी निविदा भरून दिल्या. पुनर्विकसन व्यवस्थापक समिती सभेमध्ये बंद निविदा

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता :- ८१९-अ, भवानी पेठ, पुणे:-४११ ०४२.
नोंदणी क्र.:-बी-३०५६, दिनांक:-१४-११-१९६०.

---

संस्थेच्या व्यवस्थापक समिती मध्ये ओपन करून त्या निविदेवर संस्थेचा गोल शिक्का आणि व्यवस्थापक समितीमधील सभासदांनी सहया केल्या. पुनर्विकसन समिती सभेमध्ये ठरले की, सर्व निविदादारांना बोलवावे आणि सादरीकरण करावे.

The Saraswati Co-op. Housing Soci... Regd. No. B-3056 14-11-1960

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने,

Madhu L. Sharma

अध्यक्ष सचिव खजिनदार